# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. ५२/२०१०/२५.०२.२०१०

| | |
|---|---|
| पुष्पम पॅलेस अपार्टमेंट,<br>प्लॅाट नं.१०२, भाजी मार्केट<br>उल्हासनगर,४२१००१ | तक्रारदार ग्राहक |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| अधिक्षक अभियंता 'महावितरण'<br>मंडल कार्यालय,रत्नागिरी. | विरुध्द पक्षकार |

| | |
|---|---|
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर<br>अध्यक्ष<br><br>२) श्री. एस्. एस्. तायडे<br>कार्यकारी अभियंता<br>व सचिव |

| | | |
|---|---|---|
| | | **प्रतिनिधी** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **श्री. कल्याणदास वसंतराम जेसवानी.** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **श्री. एस.डब्ल्यु.क्षीरसागर.**<br>**कार्यकारी अभियंता,मंडल कार्यालय.**<br>**रत्नागिरी.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

तक्रारदार ग्राहक श्री. कल्याणदास वसंतराम जेसवानी.पुष्पम पॅलेस अपार्टमेंट, प्लॉट नं.१०२, भाजी मार्केट प्लॉट नं.१०२, उल्हासनगर,४२१००१ यांनी वसुली RLC परत मिळण्यासाठी आणि ठेवीवरील व्याज आणि TDS सर्टिफिकेट मिळण्यासाठी मंचाकडे २५/०२/२०१० अर्ज दाखल केला असून तो आवश्यक त्या तपशिलासह विहीत नमुन्यात आहे. सदरहु तक्रार आयोगाच्या नियमावली नुसार मंचाकडे दाखल करण्यात आलेली आहे.

तक्रार दि.२५/०२/२०१० रोजी दाखल होताच मंचाकडील पत्र क्र.६३३ दि.२५/०२/२०१० च्या पत्रानुसार अधिक्षक अभियंता मंडळ कार्यालय रत्नगिरी, यांच्याकडुन प्रकरणाविषयी स्पष्टीकरण मागण्यात आले असता मंडळ कार्यालय यांनी त्याच्याकडिल पत्र क्र.१२९० दि.०४/०३/२०१० पत्रानुसार तक्रार प्रकरणातील सर्वतो तपशिल आवश्यक त्या कागदपत्रासह मंचाकडे दि.०५/०३/२०१०

रोजी दाखल केली असता सदरहु प्रकरणाची दि.१२/०३/२०१० रोजी नोटीस काढण्यात येऊन दि.२३/०३/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी कालावधीत तक्रारदार ग्राहक आणि महावितरणच्या वतीने उपस्थित राहून उभयबाजुंनी युक्तीवाद करण्यात आला.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की, ग्राहक श्री. कल्याणदास वसंतराम जेसवानी एक भागीदार श्रीराम आईस फॅक्टरी, सी टी एस नंबर.८४३ सर्वे न.४२/१आणि ४२/२ पेठकिल्ला रत्नागिरी. यांनी सदरची जागा आणि कंपनी सद्याचे मालक मे.कारुण्य मरिन एक्सपोर्ट प्रा.लि. यांना विकली . मे.कारुण्य मरिन एक्सपोर्ट प्रा.लि यानी उच्चदाब विद्युत पुरवठा ग्राहक क्र.२१००१९००६१० १ मध्ये नावात बदल करण्यासाठी अधिक्षक अभियंता मंडळ कार्यालय रत्नागिरी यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज सादर केला असता अधिक्षक अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र ८० दि.२१/०२/२००६ नुसार नावात बदल करण्यात मंजुरी दिलेली आहे . आदरणीय महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या दि.१०/०३/२००४ च्या आदेशानुसार महावितरणने (पुर्वीची म.रा.वि.मं) उच्चदाब ग्राहकाकडून RLC चार्जेस डिसेंबर २००३ पासून सप्टेंबर २००६ पर्यत ५० पै.प्रति युनिट नुसार वसुल केलेले होते. आदरणीय महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या सुचनेनुसार महावितरणने त्यांचे पत्र क्र.४३५८३ दि.१५/१२/२००८ नुसार वसुल केलेल्या रकमेपैकी १५.५ टक्के ग्राहकास RLC परत करण्याचे परिपत्रक काढले.

या प्रकरणाची सुनावणी दि.२३/०३/२०१० रोजी घेण्यात आली असता ग्राहकाच्या वतीने स्वत: ग्राहक श्री. कल्याणदास वसंतराम जेसवानी हे उपस्थित राहुन आपला युक्तीवाद केला. महावितरणच्या वतीने कार्यकारी अभियंता श्री एस.डब्ल्यु.क्षीरसागर.यांनी उपस्थित राहुन आपला युक्तीवाद केला. ग्राहकानी आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की RLC चार्जेस माझ्याकडून विद्युतबिलातून डिसेंबर २००३ पासून फेब्रुवारी २००६ पर्यत वसुल केलेल आहे. त्यामुळे महावितरण परत करीत असलेली १५.५ टक्के RLC मला मिळावी . त्याचप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझिट आणि TDS सर्टिफिकेट मला परत मिळावे.

महावितरणच्या वतीने श्री एस.डब्ल्यु.क्षीरसागर कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय रत्नागिरी यांनी स्पष्ट केले की मे.श्रीराम आईस फॅक्टरी यांच्यानावे असलेले उच्चदाब कनेक्शन मे. कारुण्य मरिन एक्सपोर्ट प्रा.लि. यांना विकुन उच्चदाब कनेक्शन नविन ग्राहकाच्या नावे आवश्यक त्या कागदपत्रासहीत हस्तातरीत केलेले आहे. मुख्य कार्यालय यांचे पत्रा क्र. ४३५८३ दि.१५.१२.२००८ नुसार २००८ मधील क्र.७ नुसार RLC चार्जेस सुरु असलेल्या त्याच उच्चदाब कनेक्शन मधील विद्युत बिलातून परत करण्यात येत आहे. त्यामुळे जुन्या ग्राहकास RLC चार्जेस परत देता येणार नाही. मे.श्रीराम आईस फॅक्टरी यांच्या नावाने अनामत रक्कम ०५/०२/२००६ रोजी परत केलेली आहे.

या तक्रार प्रकरणात दाखल झालेला तपशिल, उभय बाजुंनी केलेला युक्तीवाद व अन्य अनुशंगिक बाबी तपासता महावितरण ग्राहकास RLC चार्जेस नियमानुसार परत करीत आहे. त्याचप्रमाणे जुन्या ग्राहकाची अनामत रक्कम परत केलेली आहे. परंतु एप्रिल २००६ ते ऑगस्ट २००६ पर्यतची अनामत रक्कमेवरील व्याज जुन्या ग्राहकास देण्यात आलेले नाही आहे. महावितरणने त्यांच्या पत्र क्र.८० दि.२१/०२/२००६ नुसार सदर विद्युत कनेक्शन जुन्या ग्राहकाच्या नावावरुन नविन ग्राहकाच्या नावावर हस्तांतरित केलेले आहे.व नविन ग्राहकाकडून नविन अनामत रक्कम भरुन घेतलेली आहे.

वरील तपशिलावरुन महावितरणने जुने ग्राहक श्रीराम आईस फॅक्टरी यांस त्यांच्या अनामत रकमेवर एप्रिल २००६ पासून ऑगस्ट २००६ पर्यत महवितरणच्या तत्कालिन दरानुसार व्याज मिळण्यास पात्र आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे. या प्रकरणातील एकूणच वस्तूस्थिती नुसार जे निष्कर्ष मंचाने नोंदविलेले आहेत त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत असून त्याची कार्यवाही विहीत कालावधीत करणे महावितरणला बंधनकारक राहील.

## आदेश :-

**१. ग्राहकाची RLC चार्जेस महावितरणकडून परत मिळण्याची मागणी नाकारण्यात येत आहे.**

**२. ग्राहकाच्या अनामत रकमेवर एप्रिल २००६ ते ऑगस्ट २००६ पर्यत महावितरणच्या तत्कालिन नियमानुसार व्याज ३० दिवसात देण्यात यावे.**

**३. आदेश क्र.२ च्या कार्यवाहीस ३० दिवसापेक्षा विलंब झाल्यास पुढील प्रत्येक दिवसाला रु.१०० याप्रमाणे ग्राहकास भरपाई देणे महावितरणवर बंधनकारक राहील. भरपाई देण्यास कसुर झाल्यास पुढील दंडात्मक कारवाईस महावितरण पात्र ठरेल. विहीत कालावधीत कार्यवाही करुन पुर्तता अहवाल १५ दिवसात मंचाकडे दाखल करण्यात यावा.**

**४. या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**पत्ता :-**

**सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य**
**विदयुत नियमक आयोग**
**६०६/६०८ केशवा बिल्डींग/**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१**
**फोन नं. ०२२ / २६५९२९६५**

| | |
|---|---|
| **श्री. एस्. एस्. तायडे**<br>कार्यकारी अभियंता<br>व सचिव<br>ग्राहक तक्रार निवारण मंच<br>कोकण परिमंडल रत्नागिरी | **श्री. डी. एस्. जामखेडकर**<br>अध्यक्ष<br>ग्राहक तक्रार निवारण मंच<br>कोकण परिमंडल रत्नागिरी |

दिनांकः- २५.०४.२०१०
ठिकाणः- रत्नागिरी.